# १२ पंचवार्षिक योजना

| योजना | कालावधी | अपेक्षित दर | वास्तविक दर | प्रतिमान | मुख्यभर | टोपन नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | १ एप्रिल,१९५१ ते ३१ मार्च, १९५६ | २.१ | ३.५ | हेरॉल्ड डोमार | कृषी | पुनरुत्थान योजना |
| दुसरी | १ एप्रिल,१९५६ ते ३१ मार्च, १९६१ | ४.५ | ४.२ | पी.सी.महालनोबीस | जड व मूलभूत उद्योग | भौतिकवादी योजना |
| तिसरी | १ एप्रिल,१९६१ ते ३१ मार्च, १९६६ | ५.६ | २.८ | पी.सी.महालनोबीस एस.चक्रवर्ती | कृषी व जड उद्योग १९६२ नंतर संरक्षण | भौतिकवादी योजना |
| | १ एप्रिल,१९६६ ते ३१ मार्च, १९६९ | – | ३.९ | – | – | Plan Holiday's |
| चौथी | १ एप्रिल,१९६९ ते ३१ मार्च, १९७४ | ५.७ | ३.२ | ॲलन मान अशोक रुद्र | स्थैर्यासह वाढ | गाडगीळ योजना |
| पाचवे | १ एप्रिल,१९७४ ते ३१ मार्च, १९७९(७८) | ४.४ | ४.७ | ॲलन मान डी.डी.धर | जड व मूलभुत उद्योग | दारिद्रय निर्मुलन स्वालंबन |
| | १ एप्रिल,१९७८ ते ३१ मार्च, १९८० | – | – | प्रा.डी.टी.लकडवाला | – | Rolling Plan सरकती योजना |
| सहावी | १ एप्रिल,१९८० ते ३१ मार्च, १९८५ | ५.२ | ५.५ | ॲलन मान अशोक रुद्र | दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मिती | गरिबी हटावी |
| सातवे | १ एप्रिल,१९८५ ते ३१ मार्च, १९९० | ५.० | ५.६ | ब्रम्हानंद वकील | उत्पादक रोजगार निर्मिती | रोजगार निर्मितीची जनक |
| | १ एप्रिल,१९९० ते ३१ मार्च, १९९२ | – | – | – | – | Yearly Plan |
| आठवी | १ एप्रिल,१९९२ ते ३१ मार्च, १९९७ | ५.६ | ६.५ | राव व मनमोहन सिंग | मानव विकास | सुधारणावादी योजना |
| नववी | १ एप्रिल,१९९७ ते ३१ मार्च, २००२ | ६.५ | ५.५ | गांधीवादी | शिक्षण | – |
| दहावी | १ एप्रिल,२००२ ते ३१ मार्च, २००७ | ७.९ | ७.७ | गांधीवादी | शिक्षण | – |
| अकरावी | १ एप्रिल,२००७ ते ३१ मार्च, २०१२ | ८.१ | ७.९ | पूरा (PURA) डॉ.एपीजे अब्दुल कलाम | सामाजिक सेवा | – |
| बारावी | १ एप्रिल,२०१२ ते ३१ मार्च, २०१७ | ८.२ | – | नवगांधीवादी | आर्थिक वृध्दीसह समावेश व शाश्वत विकास | – |


# संकलन-प्रा.गोविंद जाधव

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सार्वजनिक खर्च | | | राज्य निर्मिती |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | सर्वाधिक | सर्वात कमी | |
| जवाहरलाल नेहरु | गुलजारीलाल नंदा | ४१७८ १९६० | वाहतुक व दळणवळण-२७% | ग्रामोद्योग लहान- २% | आंध्रप्रदेश १ ऑक्टोंबर १९५३ |
| जवाहरलाल नेहरु | टी.टी. कृष्णामाचारी | ४८०० ४६०० | वाहतुक व दळणवळण-२८% | ग्रामोद्योग लहान- ४% | महाराष्ट्र, गुजरात १ मे, १९६० |
| जवाहरलाल नेहरु | एस.एम.त्रिवेदी | ७५०० ८५७७ | वाहतुक व दळणवळण-२७.७% | ग्रामोद्योग लहान- २.८% | नागालँड-१ डिसेंबर,१९६३ गोवा मुक्तीसंग्राम |
| | योजना सुट्टी | | | | पंजाब व हरियाना १९६६ |
| इंदिरा गांधी | धनंजय गाडगीळ | १५९०२ १५७९९ | उद्योग व रसायने २१.०% | ग्रामोद्योग लहान- १.८% | हिमाचल प्रदेश-१९७१ मणीपूर,त्रिपूरा,मेघालय-१९७२ |
| इंदिरा गांधी | दुर्गा प्रसाद धर | ३७२४० ३९४२६ | कारखानदारी २४.०% | बांधकाम- ०.१% | सिक्किम १९७५ |
| | | | | | |
| इंदिरा गांधी | एन.डी.तिवारी | ९,७५,५०० १०,९,२९२ | उर्जा-२८.१% | शस्त्रे व तंत्रविज्ञान- ०.९% | सिक्किम १९७५ |
| राजीव गांधी | मनमोहन सिंग | १,८०,००० २,१८,७२९ | उर्जा-३०.४% | शस्त्रे व तंत्रविज्ञान- १.४% | मिझोराम व अरुणाचल प्र.१९८७ गोवा - १९८७ |
| | वार्षिक योजना | | | | |
| नरसिंह राव | प्रणव मुखर्जी | ४,३४,१२० ४,७४,१२९ | उर्जा-२६.६% | विशिष्ट क्षेत्र विकास १.६% | - |
| देवेगौडा | मधू दंडवते | ८,९५,२०० ९,४१,०४० | उद्योग-२६.९% | कृषी- १२% | छत्तीसगड, उत्तरांजल,झारखंड २००० |
| अटलबिहारी वाजपेयी | के.सी.पंत | १५,२५,६३९ १६,१८,४६० | सामाजिक सेवा -२७.०% | तंत्रविज्ञान - १.८% | - |
| मनमोहन सिंग | माँटेसिंग अहलुवालिया | ३४,४४,७१८ केंद्र-२१,५६,५४० राज्य-१४,८८,१४७ | उर्जा -३२.५७% | साधारण सेवा १.२% | - |
| मनमोहन सिंग | माँटेसिंग अहलुवालिया | २०१४ पासून स्थगित | - | - | २ जुन २०१४ तंलगना आंध्रप्रदेश मधुन |


# पहिली पंचवार्षिक योजना

**(उपनाव - पुनरुत्थान योजना)**

- **कालावधी :- 1 एप्रिल, 1951 ते 31 मार्च, 1956.**
- मुख्य भर :- कृषी क्षेत्र विकास.
- प्रतिमान :- हेरॉल्ड डोमार प्रतिमानाचा वापर.



- **अध्यक्ष :- पं. जवाहरलाल नेहरु.**



- **उपाध्यक्ष :- गुलजारीलाल नंदा.**

- **आर्थिक उद्दिष्ट्ये :-**

अपेक्षित लक्ष - **2.9%**

वास्तविक लक्ष :- **3.6%**

- **योजना खर्च :-**

**एकुण खर्च - 4178 कोटी रु.**

त्यापैकी सार्वजनिक क्षेत्रावर

**प्रस्तावित खर्च - 2378 कोटी रु.**

**खाजगी क्षेत्र - 1800,**

**वास्तविक खर्च :- 1960 कोटी रु.**

**सार्वजनिक खर्च विभागणी**

| | **खर्च कोटीत** | **एकुण खर्चाशी शेकडा प्रमाण (%)** |
|---|---|---|
| 1. शेती आणि समाज विकास | 291 | 15 |
| 2. मोठे व लहान सिंचन प्रकल्प | 310 | 16 |
| 3. ऊर्जा | 260 | 13 |
| 4. ग्रामाद्योग लहान, प्रमाणावरील उद्योग | 43 | 2 |
| 5. उद्योग खनिजे | 74 | 4 |
| 6. **वाहतुक व दळणवळण** | **523** | **27** |
| 7. सामाजिक सेवा इतर | 459 | 23 |


**योजनेची उद्दिष्ट्ये :-**

1. दुसऱ्या महायुद्धामुळे व फाळणीमुळे विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था सावरुन समतोल राखणे.
2. देशातील साधन साम्रगीचा पर्याप्त वापर करणे व अन्नधान्याची समस्या सोडविण्यास मदत करणे. कच्चामाल वाढवणे, ताग, कापूस, तांदूळ इत्यादी.
3. चलन तुटवडा / भाववाढ नियंत्रणात आणने.
   1939 - 100 रु. मुळ वर्ष किंमत.
   1950-51 - 410 रु. सर्वसाधरण किंमत निर्देशांक होता.
4. सिंचन प्रकल्प, जलविद्युत रेल्वे इत्यादी विकास करणे.
5. वेगवान वृद्धीकरणे.
6. 26 जानेवारी, 1950 नुसार स्वीकारलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरुन सामाजिक न्यायाच्या उपाययोजना करणे.
7. शेती व जलसिंचन क्षेत्राचा विकास करणे.

## महत्त्वाचे जलसिंचन प्रकल्प :-

**1. दामोदर खोरे विकास प्रकल्प -**


दामोदर नदी - झारखंड, प. बंगाल - पं. बंगालचे दु:खाश्रू.



---

**2. भाक्रा-नानगल प्रकल्प (सर्वात उंच) -**

सतलज नदी - हिमाचल प्रदेश - पंजाब.



---

**3. कोसी प्रकल्प - बिहारचे दु:खाश्रू -**

कोसी नदी - बिहार.



---

**4. हिराकूड योजना - सर्वात मोठी लांबी -**

महानदी - ओरीसा.



---

वरील प्रकल्पाची आखणी अमेरिकेतील **टेन्सी खोरे** प्रकल्पानुसार केली आहे.

## उद्योग :-





1. सिंद्री - झारखंड - खत कारखाना - 1951 - प्रथम कारखाना.
2. **चित्तरंजन** - प. बंगाल - रेल्वे इंजिन.
3. **पेरांबूर** - तामिळनाडू - रेल्वे डब्बा कारखाना.
4. **हिंदुस्तान अँटीबायोटिक्स** - पिंपरी चिंचवड, पुणे प्रतिजैविकाचा कारखाना.
5. **HMT** - बैंगलोर - Hindustan Machine tools
6. जहाज बांधणीचा कारखाना - विशाखापट्टणम - तामिळनाडू.

## महत्त्वाचे कार्यक्रम :-

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

- **2 ऑक्टोंबर 1952 - अमेरिकेच्या साह्याने सामुदायिक विकास कार्यक्रम व राष्ट्रीय विस्तार योजना, 1953. (Community Development programme - CDP)**
- 1952 - अखिल भारतीय हातमाग बोर्डाची स्थापना.
- 1953 - भारतीय खादी व ग्रामोद्योग बोर्ड.
- 1953 - हवाई वाहतुकीचे राष्ट्रीयकरण - एअर इंटरनॅशनल / इंडियन एअरलाईन्सची स्थापना.
- **PL 480 - (PL - Public Law) - USA -**

**अन्नधान्य करार.**

1956 मध्ये करार करण्यात आला.

- 28 डिसेंबर, 1953 - विद्यापीठ अनुदान आयोग - **UGC.**

## वित्तीय संस्था :-

- 5 जानेवारी, 1955 - **ICICI,**
  **खाजगी वित्तीय महामंडळ**
  औद्योगिक अधिनियम - 1951.
  6 एप्रिल, 1948 - पहिल्या औद्योगिक धोरणास सहभाग.

- 1 जुलै, 1955 - **SBI, (सार्वजनिक बँक)**
  **1921 मधील इम्पेरियल बँकेचे**
  **SBI मध्ये विलीनीकरण**

- 1956 - IIT ची स्थापना,
  India Institute of Technology.

## राजकीय घटक :

- **1951-52 - राज्यघटनेनुसार पहिल्या सार्वत्रिक निवडणुका. सुकुमार सेन पहिले निवडणुक आयुक्त.**

- **आंध्र राज्याची निर्मिती - 1 ऑक्टोंबर, 1953. उपोषण - पोटी श्रीरामलू.**
  व 1 ऑक्टोबर, 1953 भाषिक तत्त्वावर राज्यनिर्मिती.

## मूल्यमापन -

1. **यशस्वी योजना**
   कारणे - 1. लक्ष कमी होते
   2. मान्सुन चांगला होता.

2. **अन्नधान्य उत्पादन वाढ -** 52.2 MT वरुन 65.8 MT वाढ.

3. **वृध्दीदरात वाढ -** 2.1% वरुन 3.6% साध्य.

4. **राष्ट्रीय उत्पन्न** 18% ने द.डो.उ. 11% ने वाढले.


5. **किंमत निर्देशांकात घट.**

# दुसरी पंचवार्षिक योजना

**(भौतिकवादी योजना /**

**नेहरु - महालनोबिस योजना)**

- **कालावधी :- 1 एप्रिल, 1956 ते 31 मार्च, 1961**
- **2 मे 1956 रोजी राष्ट्रीय विकास परिषदेणे मान्यता दिली.**



- **अध्यक्ष :- पं. नेहरु.**



**उपाध्यक्ष :- टी.टी. कृष्णमाचारी.**

- **प्रतिमान :- प्रा. पी.सी. महालनोबिस.**

1928 - हे प्रतिमान रशियातील फेल्डमनच्या सोविएट प्रतिमानावर आधारित आहे.

- **मुख्य भर :- वेगवान औद्योगिक वृद्धी.**

**आपेक्षित मुल्य - 4.5%,**

**वास्तविक मूल्य - 4.1%.**

- **भर :- जड व मुलभूत उद्योगाचा विकास.**

यासाठी 1956 मध्ये भारताचे **दुसरे औद्योगिक धोरण जाहीर.**

- महालनोबिस प्रतिमानाला पर्याय म्हणुन - ब्रह्मानंद आणि वकील यांनी - मजुरी वस्तू प्रतिमान (Wage Goods Model)

**सार्वजनिक खर्च विभागणी**

| | | खर्च कोटीत | एकुण खर्चाशी शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| 1. | शेती आणि समाज विकास | 530 | 11 |
| 2. | मोठ्या व मध्यम स्वरुपाच्या जलसिंचन योजना | 420 | 09 |
| 3. | ऊर्जा साधने | 445 | 10 |
| 4. | ग्रामोद्योग व लघुउद्योग | 175 | 04 |
| 5. | उद्योग व खनिजे | 900 | 20 |
| 6. | **वाहतुक व दळणवळण** | **1300** | **28** |
| 7. | सामाजिक सेवा व संकीर्ण बाबी | 830 | 18 |

**योजनेचा खर्च :-**

- प्रस्ताविक खर्च :- **4800 कोटी रु.**

प्रत्यक्ष खर्च :- **4600 कोटी रु.**

**उद्दिष्ट्ये :-**

1. राष्ट्रीय उत्पन्नात प्रतिवर्ष **5%** वाढ घडून आणने.
2. 5 वर्षात 10 ते 12 दशलक्ष रोजगार निर्मिती करणे.
3. अवजड व पायाभूत उद्योगांच्या विकासावर भर.
4. जलद औद्योगिक विकास
5. उत्पन्न व संपत्तीमधील विषमता कमी करणे. आर्थिक घटकाचे समान वाटप.
6. **समाजवादी समाजरचना निर्माण करणे -**

तिसरी अनुसूची.प्रथम स्विकार जानेवारी, 1955.

**विशेष घटनाक्रम :-**

**आवडी अधिवेशन-अध्यक्ष**

**अध्यक्ष-उच्छरंगराई नवलशंकर ठेबर**

- **30 एप्रिल, 1956 दुसरे औद्योगिक धोरण.**
- खादी व ग्रामोद्योग कार्यक्रमाची सुरुवात - 1957-58.
- 1960-61 सधन कृषीक्षेत्र कार्यक्रम.

## प्रकल्प :-

- भिल्लाई - रशिया - 1959.
- रुरकेला - जर्मनी - 1959.
- दुर्गापुर - ब्रिटन - 1962.



- BHEL - भोपाळ - 1956.
- दोन खत कारखाने - 1) नानगल, 2) रुरकेला.

## महाराष्ट्र राज्य निर्मिती :-

- महागुजरात.
- **संयुक्त महाराष्ट्र समिती / महागुजरात समिती आंदोलन.**




- 1 मे, 1960 - कायद्यानुसार केली.
- अणुऊर्जा आयोग - 1 मार्च, 1958 - अध्यक्ष, होमी जे भाभा.
- नांगल खत कारखाना - 1961. - पंजाब.

## वित्तीय संस्था :-


- LIC - 245 खाजगी कंपन्याचे एकत्रिकरण.
- स्थापना - 1 सप्टेंबर, 1956.
- BSE - 5 फेब्रुवारी, 1877 - अधिकृत मान्यता - 31 ऑगस्ट, 1957, मुंबई.

## मुल्यमापन :-


- वाढीचा दर 4.21% संपादीत केला.
- पोलाद उद्योगाची विशेष वाढ.
- समाजवादी समाजरचना उद्दिष्ट्ये अपयशी.
- परकीय चलनसाठ्यात वाढ.
- वस्तूच्या किमतीत वाढ WPI - 105. - 1952-53. 4.5 - 4.2.
- अन्नधान्य **1955-56 - 65.8**
  **1960-61 - 80.5**
- राष्ट्रीय उत्पादनात वाढ - **19.5.**
- लोकसंख्या - 10.3% वाढ.
- भांडवल गुणोत्तर - 2:1 प्रत्यक्षात 4:1.

# तिसरी पंचवार्षिक योजना

- **कालावधी :- 1 एप्रिल, 1961 ते 31 मार्च, 1966**
- मान्यता :- रा.वि. परिषद - 1 जुन, 1961.



- **अध्यक्ष :- पं. नेहरु**



**लालबहादूर शास्त्री.**

- उपाध्यक्ष :- सी.एम. त्रिवेदी, अशोक मेहता.
- **मुख्य भर :- कृषी व मुलभूत उद्योग.**
- **प्रतिमान :-**

**महालनोबिस प्रतिमानावर आधारित सुखमाय चक्रवर्ती.** the Mathematical Framework of the III Plan. या लेखावर आधारित.

- दर :- अपेक्षित दर - **5.6%**,
  वास्तविक दर - **2.8%.**
- संकल्पित खर्च :- **7500 कोटी,**
  प्रत्यक्षात खर्च - **8577 कोटी.**
  **हरित क्रांती**

सुरुवात - 1965



पिक :- तांदूळ आणि गहू
- जागतिक जनक - **नॉरमन बोरलॉग**
भारतीय जनक - **एम.एस.स्वामिनाथन**
महाराष्ट्रातील जनक - **वसंतराव नाईक**
**सी.सुब्रहमण्यम** - कृषीमंत्री

**सार्वजनिक खर्च विभागणी**

| | | खर्च कोटीत | एकुण खर्चाशी शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| 1. | शेती व समाज विकास | 1089 | 12.7 |
| 2. | मोठे व लहान सिंचन | 664 | 7.7 |
| 3. | ऊर्जा साधने | 1252 | 14.6 |
| 4. | ग्रामोद्योग व लघू उद्योग | 241 | 2.8 |
| 5. | संघटित उद्योग व खाणकाम | 1726 | 20.1 |
| 6. | **वाहतुक आणि दळणवळण** | **2112** | **24.7** |
| 7. | सामाजिक सेवा व संकीर्ण बाबत | 1493 | 17.4 |

***1962 नंतर खर्च संरक्षण व विकासाकडे वळवला.***

**उद्दिष्ट्ये :-**

- आर्थिक वाढ - लक्ष 5.6%.
- स्वावलंबी व स्वयंपुर्ण अर्थव्यवस्था निर्मिती.
- रोजगार निर्मिती.
- संधीची समानता.
- राष्ट्रीय उत्पन्नात 5% वाढ घडुन आणने.
- अन्नधान्य स्वयंपुर्णता.

## मुल्यमापन :-

- **अन्नधान्य 82% वरुन 72% पर्यंत.**
- रा. उत्पन्न 42% कमी.
- IMF चे कर्ज - 1966 - 36.5 % होते.

## घटनाक्रम :-

- भारत - चीन युद्ध - 1962.
- भारत - पाकिस्तान युद्ध - 1965.
- दुष्काळ - 1966.
- गोवा मुक्ती संग्राम :- 417 वर्षे पोर्तुगीज.
- डिसेंबर, 1961 - 12 घटनादुरुस्ती.
- नागालँड - 1 डिसेंबर, 1963 - 13 वी घटनादुरुस्ती.
- हिंदीविरोधी चळवळ.
- 1964-65 सधन कृषी क्षेत्र कार्यक्रम (IAAP)
- **कृषी किंमत आयोग :- (APC)** प्रो. दांतवाला, जानेवारी, 1965.
- **भारतीय अन्नमहामंडळ - (FCI)** 14 जानेवारी, 1965.
- **IDBI -** 1964 - 1 जुलै, 1964.
- **UTI -** 1 जुलै, 1964.

1. 6 जुन, 1966 - रुपयाचे अवमूल्यन - 36.5%. (डॉलर व इतर Hard चलनाबाबतीत अवमूल्यन घडून आणले.) $ = 4.76 रु. वरुन 7.50 पर्यंत. ℑ = 13.30 वरुन 21 पर्यंत.

- **हरितक्रांतीची सुरुवात :- 1965**
  संकल्पीत खर्च - 2081 कोटी. प्रत्यक्ष खर्च - 2221 कोटी. 129 कोटी तुटीचा अर्थभरणा.

## 1. पहिली वार्षिक योजना :-

- अजुन एक दुष्काळ.
- 1966 मध्ये हरितक्रांतीच्या तंत्राज्ञानाचा अवलंब.
- HYVP ची लागवड - High Yeild Varity Product - उच्च उत्पादन क्षमता असणारे उत्पादन बियाणे.
- **पंजाब व हरियाना राज्याची निर्मिती.**
- पंजाब - हरियाना राज्यनिर्मिती - 1 नोव्हेंबर, 1966 (Punjab Recogrisation Act.)

**योजनेची उद्दिष्ट्ये :-**

1. वार्षिक 5.5% वृद्धीदर गाठणे.
2. आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देणे.
3. स्वालंबन प्राप्त करुन देणे - 1971 पर्यंत PL480 - आयात थांबवणे.
4. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्तापित करणे.
5. रोजगार संधी मिळवून देणे.
6. समतोल प्रादेशिक विकास.
7. आर्थिक संस्थाची पुनर्रचना.
8. सार्वजनिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रात वाढ घडुन आणने.

- **वित्तीय साधन सामग्री :-**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय मार्ग | 12,438 | - 78.2 |
| परकीय मदत | 2614 | - 16.4 |
| तुटीची भरणा | 850 | - 5.4 |

### घटना :-

- भारत - पाकिस्तान युद्ध - 1971
  (3 डिसेंबर ते 16 डिसेंबर, 1971.)
  1972 भारत - पाक सिमला करार -
  बांग्लादेशचे आस्तीत्व मान्य.
- तेलाचे संकट.
  पहिले - 1973 (400% वाढ)
  दुसरे - 1979 (100% वाढ)
  तिसरा - 1991 - पहिले आखाती युद्ध. "Mini Oil Shock"

## 2. दुसरी वार्षिक योजना :-

- 1 एप्रिल, 1967 - 31 मार्च, 1968.
- अन्नधान्य उत्पादनात वाढ.
- 1967-68 मध्ये 95 दशलक्ष टन वाढ.
- संकल्पीत खर्च :- 2264 कोटी, 359 - तुटीचा अर्थभरणा.

## 3. तिसरी वार्षिक योजना :-

- अन्नधान्य उत्पादन :- 94 दशलक्ष टन झाले.
- किंमत निर्देशांक घट - 167.3 वरुन 165.4
  (1961-62 मुळवर्ष)
- प्रस्तावित खर्च - 2337. तुटीचा अर्थभरणा - 307.

### योजना अपयशाची कारणे



1962 मधील चीनसोबतचे युद्ध.



1965 पाकिस्तान सोबतच युद्ध.



1965-66 मधील भयानक दुष्काळ.

| | 1966-67 | 1966-67 | 1967-68 | 1968-69 |
|---|---|---|---|---|
| 1. शेती समाज विकास व सहकार | 967 | 334 | 314 | 319 |
| 2. सिंचन पुरनियंत्रण | 471 | 150 | 145 | 176 |
| 3. ऊर्जा साधणे | 1213 | 404 | 396 | 413 |
| 4. संघटीत उद्योग | 1511 | 514 | 471 | 526 |
| 5. ग्रामोद्योग व लहान | 126 | 43 | 42 | 41 |
| 6. वाहतुक दळण-वळण | 11222 | 424 | 398 | 400 |
| 7. सा. सेवा व इतर | 976 | 296 | 319 | 361 |
| 8. अन्नधान्याचे साठे | 140 | - | - | 140 |

**योजनाकाळाला सुट्टी - Plan Holidays.**
**तीन वार्षिक योजना.**

- **कालावधी :- 1 एप्रिल, 1966 ते 31 मार्च, 1969 - तीन वार्षिक योजना.**
- भारताची तिसरी योजना अपयशी ठरली. आपेक्षित दरापेक्षा वास्तविक दर कमी होता 5.6 - 2.8.
- 1962 मधील चीनसोबतचे युद्ध.
- 1965 पाकिस्तान सोबतच युद्ध.
- 1965-66 मधील भयानक दुष्काळ.
- या योजना काळात विकासाचा खर्च संरक्षणाकडे वळवली त्यामुळे चौथी योजना लगेच राबवता आली नाही म्हणुन 1966-69 - योजनाकाळाला सुट्टी द्यावी लागली.
- हा कालखंड योजना अवकाश किंवा योजनेला सुटी म्हणुन ओळखतात.
  1 एप्रिल, 1966 - 31 मार्च, 1967.
  1 एप्रिल, 1967 - 31 मार्च, 1968.
  1 एप्रिल, 1968 - 31 मार्च, 1969.
- अध्यक्ष :- इंदिरा गांधी.
- उपाध्यक्ष :- अशोक मेहता - 1967.
  **धनंजय गाडगीळ - गाडगीळ फॉर्म्युला. केंद्राने राज्याला देण्याचा महसुल.**
- **मुख्य भर :- स्वालंबन.**

# चौथी पंचवार्षिक योजना

**(गाडगीळ योजना)**

- **कालावधी :- 1 एप्रिल, 1969 ते 31 मार्च, 1974.**

1966 - मधील नियोजनाचे उपाध्यक्ष अशोक मेहता यांचा मसुदा एवजी योजनाकाळातील खंडामुळे धनंजय गाडगीळ यांचा नवीन मसुदा मांडला गेला.



- **अध्यक्ष :- इंदिरा गांधी.**



- **उपाध्यक्ष :- धनंजय गाडगीळ -** 1971 पर्यंत, सी. सुब्रह्मण्यम - 1972, दुर्गाप्रसाद धर -1972.

- **मुख्य भर :- स्थैर्यासह आर्थिक वाढ**

- **प्रतिमान :- ॲलन एस मान व अशोक राव** यांनी तयार केलेल्या खुले सातत्य प्रतिमानावर Open Consistanency Model वर आधारित 4 थ्या योजनेचा आराखडा - धनंजय गाडगीळ यांनी तयार केला.

- दर :- अपेक्षित दर - **5.7%,**
वास्तवित दर - **3.2%.**

- **योजना खर्च :-**

**15902 कोटी** प्रस्तावित खर्च
**15799 कोटी** वास्तविक खर्च

| | | | |
|---|---|---|---|
| शेती | 2728 | 17.2 | **24%** |
| सिंचन | 1086 | 6.8 | **कृषी क्षेत्र** |
| ऊर्जा | 2448 | 15.4 | |
| ग्रामोद्योग | 293 | 1.8 | |
| **उद्योग व रसायने** | **3338** | **21.0** | |
| वाहतुक | 3237 | 20.3 | |
| सा. सेवा | 2772 | 17.4 | |

- हिमाचल प्रदेश राज्यनिर्मिती 25 जानेवारी, 1971.

- MRTP Act - 1969 - आर्थिक (Monopolistic Restrictive Trade Practicess Act) सार्वजनिक उद्योगातील मक्तेदारी मोडीत काढणे.

MRTP ACT 1969 AND COMPETITION ACT 2002

- जुलै, 1969 - 14 बँकांचे राष्ट्रीयकरण
(50 कोटी पेक्षा जास्त)

- 1969 - नरिमन समितीच्या शिफारशीवरुन **'अग्रणी बँक'** व्यवसाय.

- **अनुकूल - व्यापारतोल - 104 कोटीचे व्यापार अधिक्य.**

- **FERA - 1973** - 1 जानेवारी, 1974 लागू.
परकीय चलनाचे संरक्षण, नियंत्रण व वृद्धी.

- **SAIL - Steel Authority of India**
- 24 जानेवारी, 1973.

सेल SAIL

- 1 जानेवारी, 1973 - सर्वसाधारण विमा महामंडळ.

- 1973-74 - दारिद्र्य उष्माकांच्या स्वरुपात मांडले.

- **ऑपरेशन फ्लड -** डॉ. वर्गीस कुरियन - 1970 - दुग्धउत्पादन वाढवणे - धवलक्रांतीला सुरुवात.

- आवर्षन प्रवण क्षेत्र कार्यक्रम - DPAP.
22 नोव्हेंबर, 1972 - GIC.



**मुल्यमापन :-**

- दोन वर्ष प्रगतीनंतर अपयश.
- तेलसंकट.
- उत्पन्नवृद्धीदर 5.7 होतो तो प्रत्यक्ष 3.2%.
- 1974 - सर्वाधिक महागाई 25.2%.
- राष्ट्रीय उत्पन्नातील एकुण वाढ - 16.5%.
- मंद औद्योगिक वाढ.

**चौथ्या योजनेदरम्यान राज्यनिर्मिती :-**

- 1971 मध्ये 27 व्या घटनादुरुस्तीनुसार मणिपूर त्रिपूरा व मेघालय या केंद्रशासित प्रदेशांना राज्याचा दर्जा देण्यात आला व तसेच मिझोराम अरुणाचलप्रदेश हे नविन केंद्रशासित प्रदेश तयार करण्यात आले.




## Oil Shock

1. 1973 - 400 पट तेलाच्या किंमतीत वाढ.
2. 1979 - 100 पट तेलाच्या किंमतीत वाढ.
3. 1991 - Mini Oil Shock



# पाचवी पंचवार्षिक योजना

- **कालावधी :- 1 एप्रिल, 1974 ते 31 मार्च, 1979.**

(1978 - मधील जनता दलाच्या सरकारने ही योजना एक वर्ष अगोदरच तहकुब केली व नवीन सरकती योजना मांडली 1978-83.) - Rolling Plan (1978-80). (जड उद्योगाकडुन दारिद्र्य निर्मुलनाकडे)



- **अध्यक्ष :- इंदिरा गांधी.**

- उपाध्यक्ष :-
**दुर्गाप्रसाद धर,**
**पी.एन. हकसर.**

- **मुख्यभर :- दारिद्र्य निर्मुलन व स्वालंबन.**

- **ॲलन मान रुद्र - डी.डी. धर.**
(ॲलन मान व अशोक रुद्र यांच्या प्रतिमानावर आधारित योजना डी.डी. धर यांनी मांडली.)

अपेक्षित दर - **4.4%**,

वास्तविक दर - **4.7%**

- **योजना खर्च :-**

प्रास्तावित खर्च - **37,240** कोटी,
वास्तविक खर्च - **39.426** कोटी,
खाजगी खर्च - 16161 कोटी.

| **सार्वजनिक खर्च :-** | | |
|---|---|---|
| शेती | 4730 कोटी | 12.8 कोटी |
| सिंचन | 2681 कोटी | 7.8 कोटी |
| उर्जा | 6190 कोटी | 16.2 कोटी |
| **खाणकाम व कारखानदारी** | **8939** | **24.0 कोटी** |
| बांधकाम | 25 कोटी | 0.1 कोटी |
| वाहतुक व दळणवळण | 7115 कोटी | 19.2 कोटी |
| गृहनिर्माण आणि जागा | 600 कोटी | 1.6 कोटी |
| बँक व्यवसाय | 90 कोटी | 02 कोटी |
| लोकप्रशासन | 98 कोओी | 0.3 कोटी |
| अन्य सेवा | 6709 कोटी | 18 कोटी |
| | **37250** | **100** |

**योजनेची उद्दिष्ट्ये :-**

- GDP मध्ये प्रतिवर्षी 5.5% वाढ घडुन आणने.
- उत्पादक रोजगार वाढ घडुन आणने.
- किमान गरजांच्या राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे.
- समाजकल्याण कार्यक्रमाची व्याप्ती वाढवणे.
- उद्योगाच्या विकासावर भर देणे विशेष - शेती, उद्योग, सेवनीय इत्यादी.
- सार्वजनिक वाटपाचा पर्याप्त कार्यक्रम राबवणे.
- आर्थिक वाढ - 4.4%
- दारिद्र्य निर्मुलन करणे.
- रोजगारात वाढ घडून आणने.

**विशेष घटना क्रम :-**

- **कार्यक्रम :-**

  TRYSEM -

  (Training of Rural Youth for Self-employment)

- **किमान गरजांचा कार्यक्रम -** 1975.

  i) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना मोफत व अनुदानित सेवा.

  ii) ग्रामीण व शहरी कामगारांची उत्पादक व कार्यक्षमता वाढवणे.

  1970-71 मध्ये 56.30% लोक दारिद्र्य रेषेखाली होते.

  1974-75 मध्ये 40% लोक दारिद्र्य रेषेखाली होते.

- **बेकारीचा अनुशेष -** Backlog - 5.3 - पहिली योजना, दुसरी योजना 8, तिसरी योजना 10 दशलक्ष.

  1971 - 18.7.




- 2 ऑक्टोबर, 1975 - 5 **प्रादेशिक ग्रामिण बँका स्थापना. - RRB.**




- 1976-77 - दुसऱ्यांदा भारताचा **व्यापारतोल अनुकुल ठरला.**

- 1976 मध्ये भारताचे **पहिले 'राष्ट्रीय लोकसंख्या धोरण' जाहीर** करण्यात आली.

- कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे नाव 'कुटूंबकल्याण' ठेवले गेले.

- 1976 पुर्वी कुटुंबनियोजन कार्यक्रम राबविण्यात आला.

- 1976-77 - शस्त्रक्रिया उद्दिष्ट्ये सत्तावीस लाखांनी ओलांडण्यात आली.

- मुलीचे वय 18 वर्षे, मुलाचे 21 वर्षे.

- 1 मे, 1976 नंतर बक्षिसांचे वितरण.

HDFC BANK

We understand your world

2 मुलांवर - 150 रु, 3 मुलांवर - 100 रु.,
4 मुलांवर - 70 रु.

- 1976 शस्त्रक्रियांचे लक्ष 43 दशलक्ष होते.

  प्रत्यक्षात 2 लक्ष.

- सक्तीचे कुटुंबनियोजन.

- **एकात्मिक बालकल्याण योजना** 'ICDS - Integrated Child Development Scheme.

- **2 ऑक्टोबर, 1975 पासुन सुरु.**

- 0-6 वयोगटातील बालकांचे पोषन व आरोग्य सुधारण्यासाठी ही योजना सुरु केली.

- 1977-78 - **वाळवंट विकास कार्यक्रम.**

  Desert Development Program.

- **1977 - HDFC** - हसमुखभाई पारेख यांच्या प्रयत्नाने स्थापना.


**राजकीय घडामोडी :-**

- **18 मे, 1974 - पोखरण राजस्थान -** 'आणि बुद्ध हसला' या सांकेतिक शब्दाने ती ओळखली जाते. सायरस अनुभटीचा वापर करुन चाचणीसाठी 'प्ल्युटोनिअम'चा वापर केला. प्रमुख - राजारामण्णा.



- 26 एप्रिल, 1975 - 36 व्या घटनादुरुस्तीनुसार सिक्कीम राज्याची राज्याचे विलनीकरण व राज्याचा दर्जा.

- **42 वी घटना दुरुस्ती - Mini Constitution सर्वात मोठी घटनादुरुस्ती 2 नोव्हेंबर, 1976 संसदेची परवानगी.** 1 एप्रिल, 1977 लागू करण्यात आली.





- आणिबाणी - 1975-76 :- 25 जुन, 1975 (देशातील तिसरी), (1962- पहिली, 1965 - दुसरी) 26 जुन, 1975 - इंदिरा गांधी.

**20 कलमी कार्यक्रम :-**
**(Twenty Point Programme - TPP)**



- उद्देश :- दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे.
  **'गरिबी हटावो' असे या कार्यक्रमाचे घोषवाक्य.**

1. गरिबी हटावो,
2. जनशक्ती,
3. किसान मित्र,
4. श्रमिक कल्याण,
5. सर्वांसाठी घरे,
6. स्वच्छ पाणी,
7. खाद्य सुरक्षा,
8. सर्वांसाठी आरोग्य,
9. सर्वांसाठी शिक्षण,
10. अनुसूचित जाती-जमाती कल्याण,
11. महिला कल्याण,
12. बालकल्याण,
13. युवा विकास,
14. झोपडपट्टी सुधारणा,
15. पर्यावरण संरक्षण वनवृद्धी,
16. सामाजिक सुरक्षा,
17. ग्रामिण सडक,
18. ग्रामिण ऊर्जा,
19. मागास भागांचा विकास,
20. ई-शासन.

- मार्च 1977 - जनता पार्टीचे सरकार अस्तित्वात आले.

- **1 एप्रिल, 1978 -**
  **जनता पार्टीची सरकती योजना (सहावी)**

- 1 एप्रिल, 1980- नवीन सहावी योजना (1980-55)

**मुल्यमापन :-**

1. चलनवाढ.
2. दारिद्र्य स्वालंबन बेरोजगारी क्षेत्रातील अपयश.
3. शेवटी वृद्धीदरात वाढ अपेक्षित होती.
4. औद्योगिक क्षेत्राचा वार्षिक वृद्धीदर 5.3%.
5. 1977-78 - पर्यंत **अन्नधान्य उत्पादन 125 टन** उद्दिष्ट्ये होते **प्रत्यक्षात 126 टन.**
6. 1974 - 25.2% सर्वाधिक भाववाढ.
7. राष्ट्रीय उत्पन्नात एकुण **वाढ 19.2%.**
8. वृद्धीदरात वाढ - 4.4 वरुन 4.7%.

# सहावी पंचवार्षिक योजना

- **कालावधी :- 1 एप्रिल, 1980 - 31 मार्च, 1985.**

- **मुख्यभर :-**
  **दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मिती.**

- **प्रतिमान :- ॲलन मान व अशोक रुद्र.**



- **अध्यक्ष :- इंदिरा गांधी.**

- **उपाध्यक्ष :-**

**एन.डी. तिवारी,**



**शंकरराव चव्हाण,**



**पी.व्ही. नरसिंहराव.**



- **अपेक्षित दर - 5.2,**
  **वास्तविक दर - 5.5.**

- संकल्पित खर्च :- **9,75,500** कोटी,
  वास्तविक खर्च - **109292** कोटी.

| सार्वजनिक खर्च | प्रत्यक्ष खर्च | % टक्केवारी |
|---|---|---|
| शेती क्षेत्र | 6624 | 6.1 |
| ग्रामिण विकास | 6997 | 6.4 |
| विशिष्ट क्षेत्र विकास योजना | 1580 | 1.4 |
| सिंचन प्रकल्प आणि पूर नियंत्रण | 10930 | 10.0 |
| **ऊर्जा** | **30,751** | **28.1 (सर्वाधिक)** |
| उद्योग आणि धातू | 16948 | 15.5 |
| वाहतूक व दळणवळण | 17678 | 13.0 |
| शस्त्रे व तंत्रविज्ञान | 1020 | 0.9 (सर्वात कमी |
| सामाजिक सेवा | 16764 | 15.4 |
| | **1,09,292** | **100%** |

| | 1979-80 | 1984-85 | |
|---|---|---|---|
| अन्नधान्ये | 109 | 149 ते 154 | 65 ते 71 |
| ऊस (दशलक्ष टन) | 128 | 200 ते 215 | 9.3 ते 10.9 |
| तेलबिया (दशलक्ष टन) | 81 | 110 | 6.3 |
| कापूस (दशलक्ष टन) | 77 | 92 | 3.6 |
| ताग (दशलक्ष टन) | 80 | 91 | 2.3 |
| कोळसा (दशलक्ष टन) | 104 | 165 | 9.7 |
| Oil | 11.8 | 21.6 | 12.9 |
| कापड (Mitter) | 10435 | 13030 4.6 | |
| सिमेंट | 177 | 34 | 133 |

## उद्दिष्ट्ये :-

1. रोजगार संधीत वाढ करणे.
2. अधुनिकीकरण घडून आणने.
3. दारिद्र्य निर्मुलन व बेकारी कमी करणे.
4. लोकसंख्या नियंत्रणात आणने.
5. जिवनमान सुधारणे.
6. प्रादेशिक असमतोल कमी करणे.
7. संपत्ती वाटपातील विषमता कमी करणे.
8. पर्यावरणीय समतोल राखने.
9. अन्नधान्य उत्पादन वाढवणे.


- **DWCRA - Development of Women & Child in Rural Areas : सप्टेंबर, 1982.**
- **बायोगॅस कार्यक्रम :-** NBMMP - National Biogas & Manvre Mange Programme. - 1981-82.
- घरगुती इंधन पुरवणे, ऑर्गनिक खत पुरविणे.
- जंगलावरील ताण कमी करणे, ग्रामिण स्वच्छता.
- **Rural Landless Employment Garantee Programme** - 15 ऑगस्ट, 1983.
- **डेअरी विकास कार्यक्रम** - 1983.
- **दुसरा वीस कलमी कार्यक्रम - 14 जानेवारी, 1982.**
- **राष्ट्रीय बियाने धोरण -** 1983.

## मुल्यमापन :-

- वाढीचा दर 5.5% वाढ.
- वास्तविक खर्चात वाढ.
- उर्जाक्षेत्रावर सर्वाधिक खर्च.
- अन्नधान्य उत्पादनत वाढ.
- चलनवाढ - 224, आधार वर्ष - 1970-71.

## महत्त्वाचे कार्यक्रम :-

- **'गरिबी हटाव' नारा देण्यात आला.**
- **ऑपरेशन ब्लू स्टार.** 3-6 जुन, 1984.



- **भोपाळ गॅस दुर्घटना -** 2, 3 डिसेंबर, 1984.




- युनियन कार्बाईड इंडिया लि. - UCIL.
- मिथाईल आयजोसायनेट - विषारी वायूची गळती - 3700. 5-6 लाख लोकांना विषबाधा.
- **15 एप्रिल, 1980 - 6 बँकांचे राष्ट्रीयकरण.**
- 1 जानेवारी, 1982 - Exim Bank.
- 12 जुलै, 1982 - NABARD Bank.
- सलेम-लोह-पोलाद उद्योग - सलेम (तामिळनाडू) - 1982. SAIL - पोलादी पत्रे.
- विशाखापट्टणम लोह-पोलाद उद्योग - A.P.
- जानेवारी, 1982 - Vizag Steel म्हणुन ओळख.
- **IRDP - Integrated Rural Development Program.** - एकात्मिक ग्रामिण विकास कार्यक्रम.
- 2 ऑक्टोबर, 1982 - उद्देश :- आर्थिक स्वालंबन, अर्थसहाय्य करणे, दारिद्र्यनिर्मुलन, RRB, सहकारी बँकामार्फत कार्ज, BPL लोकांचे प्रमाण कमी करणे.
- **NREP - National Rural Employment Program. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना - 2 ऑक्टोबर, 1980.**

# सातवी पंचवार्षिक योजना

**(रोजगार निर्मितीची जनक)**

- **कालखंड :- 1 एप्रिल, 1985 ते 31 मार्च, 1990.**

- **प्रतिमान :- ब्रह्मानंद व वकील - (वस्तू व सेवा प्रतिमानावर)**

- **आर्थिक उद्दिष्ट्ये :-**
  **अपेक्षित लक्ष - 5%,**
  **वास्तविक लक्ष - 5.6/6%**

- **घोषवाक्य :- अन्न, काम, उत्पादकता.**

- **मुख्य भर :-**
  **उत्पादक रोजगार निर्मिती.**
- घोषणा :- काँग्रेस सरकारने 1988 - वार्षिक अधिवेशनात 'गारिबी हटाव' ची घोषणा केली.

- **अध्यक्ष :- राजीव गांधी,**
  डिसेंबर, 1989 ,



**व्ही.पी.सिंग** - डिसेंबर 1989 नंतर.



- **उपाध्यक्ष :- मनमोहन सिंग** - ऑगस्ट, 1987, पी. शिवशंकर - ऑगस्ट, 1989, रामकृष्ण हेगडे - डिसेंबर, 1989 नंतर.



- योजना खर्च :- प्रस्तावित खर्च - 1,80,000 कोटी, वास्तविक खर्च - 2,18,729 कोटी.

| | | |
|---|---|---|
| शेती 10574 | 5.9 | |
| ग्रामिण विकास | 9074 | 5.0 |
| खाजगी क्षेत्रिय योजना | 3145 | 1.8 |
| सिंचन प्रकल्प व पुर नियंत्रण | 16979 | 9.4 |
| **ऊर्जा 54821** | **30.4** | |
| उद्योग व खाणकाम | 22461 | 12.5 |
| वाहतुक | 22971 | 12.8 |
| माहिती आणि आकारपाणी | 6472 | 3.6 |
| शस्त्रे व तंत्रज्ञान | 2466 | 1.4 |
| सामाजिक सेवा | 29350 | 16.3 |
| इतर बाबी | 1687 | 0.9 |
| | **1,80,000** | **100%** |

## राजकीय घडामोडी :-



### 1. बोफोर्स प्रकरण :-

- स्वीडन बोफोर्स AB कंपनी सोबत 440 बोफोर्स तोफा 155 mm Frad Howlzer खरेदी. 'द हिंदू' मधील चित्रा सुब्रमण्यम.

### 2. राज्य निर्मिती :-

- 20 फेब्रुवारी, 1987. अनुक्रमे 53 व्या 55 घटनादुरुस्तीनुसार **मिझोराम** आणि **अरुणाचल प्रदेशला** राज्यांचा दर्जा देण्यात आला.
- 30 मे, 1987 - 56 व्या घटनादुरुस्तीनुसार **गोवा या केंद्रशासित प्रदेशाला राज्याचा दर्जा.**
- **CAPART - Council for Advancement of Peoples Action & Rural Technology.**
- 1 सप्टेंबर, 1986 पासुन ग्रामिण परिक्षेत्रात नविन तंत्रज्ञान सेवा सुविधाचा अवलंब करुन एकात्मिक विकास घडविण्यासाठी CARART.
- जवाहार रोजगार योजना JRY.

1 एप्रिल, 1989 - NREP व RLEGP योजनांच्या एकत्रिकरणातुन जवाहर योजना सुरु करण्यात आली.. ग्रामिण भागात - मजुरी पुरवणारी प्रमुख योजना होती.

- **नेहरु रोजगार योजना - NRY - 1989** - मजुरी रोजगार व स्वयंसहायता गट 'शहरी भागात' सुरु.

- **राष्ट्रीय साक्षरता मिशन** - 5 मे, 1988 - 15-35 कार्यात्मक




- खडू फळा मोहिम - **Operation Black Board** - 1987. प्राथमिक शाळासाठी सुविधा पुरवणे.




- **केंद्रीय ग्रामिण साक्षरता कार्यक्रम. Central Rural Education Program - 1986.**
- **NHB - National Housing Borad - 8 जुलै, 1985.**

### मुल्यमापन :-

- **प्रायोगिक स्तरावर - विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात सुचक नियोजनाचा स्वीकार करण्यात आला.**
- 1951-1985 - आदेशात्मक नियोजन होते.
- भारत - श्रीलंका समझोता - 19 जुलै, 1987.

राजीव गांधी व जयवर्धने यांच्यात शांतता करार.

भारताने श्रीलंकेत IPKE (Indian Peace Keeping Force) सैन्य ठेवले.

LTTE (Liboration Tigers of Tamilelam) यांच्याकडुन राजीव गांधींची हत्या.

### सुरु केलेल्या योजना :-


1. **इंदिरा आवास योजना** - RLEGP - 1985-86.
   1998 - मध्ये ही योजना जवाहर योजनेमध्ये रुपांतरित केली.
   1 जानेवारी, 1996 - पासुन स्वतंत्र दर्जा. अनुसूचित जाती-जमाती वेठबिगार - गरिबांना घरे.
2. **दशलक्ष विहिरीचा कार्यक्रम :-** MWS (Million Wall Scheme)
   NREP चा भाग म्हणुन. 1988-89 पासुन ही योजना सुरु करण्यात आली.
   1989 - पासुन जवाहर योजनेत समाविष्ठ करण्यात आली.
3. **पुनर्गठित 20 कलमी कार्यक्रम :-**
   राजीव गांधी सरकारने 20 कलमी कार्यक्रम बदल.
   1986 - पासुन सुरु. 1 एप्रिल, 1987 पासुन अंमलबाजवणी.

# आठवी पंचवार्षिक योजना

**(आर्थिक सुधारणावादी योजना)**

- **कालखंड :- 1 एप्रिल, 1992 ते 31 मार्च, 1997.**

- **प्रतिमान :- जॉन डब्लू मिलर प्रतिमानावर आधारित - निर्यात प्रधान आर्थिक वृद्धीचे प्रतिमान.**
**राव - मनमोहन सिंग प्रतिमानावर वापर - LPG Model.**



- **अध्यक्ष :-**
**पी.व्ही. नरसिंह राव**
- मार्च 1996 पर्यंत,



**एच.डी. देवेगोडा** - मार्च 1996 नंतर.

- **उपाध्यक्ष :-** प्रणव मुखर्जी - मार्च 1996,
मधू दंडवते - मार्च 1996 नंतर.

- **GDP वद्धी :-**
**अपेक्षित दर - 5.6%,**
**वास्तविक दर - 6.5%.**
सुचन नियोजनाचा अवलंब - सर्व क्षेत्रांसाठी.

- **योजना खर्च :-** प्रस्तावित खर्च - 434120 कोटी, वास्तविक खर्च - 474129 कोटी.

- **घोषवाक्य / भर :-** मानव विकास आणि मनुष्यबळ विकास.

| | | |
|---|---|---|
| शेती व सलग्न | 22674 | 5.2 |
| ग्रामीण विकास | 34425 | 7.9 |
| विशिष्ट क्षेत्रीय विकास | 6750 | 1.6 |
| सिंचन व पुरनियंत्रण | 32525 | 7.5 |
| **ऊर्जा 115561** | **26.6** | |
| उद्योग व खनिजे | 46922 | 10.8 |
| वाहतुक | 55926 | 12.9 |
| दळणवळण | 22110 | 5.8 |
| शस्त्रे तंत्रविज्ञान व वातावरण | 9042 | 2.1 |
| सामाजिक सेवा | 79012 | 18.2 |
| इतर 6360 | 1.4 | |

**उद्दिष्ट्ये :-**

1. या शतकाच्या अखेरीस पुर्ण रोजगाराचे उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी पुरेशा रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
2. लोकसंख्या वाढीचा दर कमी करणे व नियंत्रण.
3. 15 ते 35 सर्वाना प्राथमिक शिक्षण देणे व निरक्षरता कमी करणे.
4. ऊर्जा, वाहतुक, दळणवळण, सिंचन इत्यादी सोयी-सुविधा वाढत्या प्रमाणात उपलब्ध करुन देऊन भावी काळातील देशाचा विकास करणे.
5. सर्व खेड्यात स्वच्छ व पुरेशा पिण्याच्या पुरवठा करणे आरोग्य सेवा पुरवणे.
6. शेतीक्षेत्राचा विकास करुन व त्याचे विविधीकरण करुन अन्नधान्य बाबतीत देश स्वयंपुर्ण करणे व निर्यातीस योग्य शेतीमालाची वाढ करणे.

## योजनेला विलंब झाला कारण :-

- राजकीय अस्थिरता.
- वित्तीय तुट GDP च्या प्रमाण - 8.2. 1990-91. 8.4% होती.
- परकीय गंगाजळीतील गळती / घट. 1991 मध्ये 1 बिलीयन डॉलर एवढे परकीय चलन होते.
- राजकोषीय तुट - कर्जाच्या प्रमाणात वाढ.
- BOP मधील तुट.

## कार्यक्रम :-

- **सन 1992 - सेबी -**
  **SEBI -** ला वैधानिक दर्जा.




**निर्गुंतवणुक आयोग :-**

- जुलै 1991 मध्ये डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली निर्गुंतवणुक समिती स्थापन करण्यात आली.
- संरक्षण व अणुऊर्जा सोडुन - इतर क्षेत्राचे खाजगीकरण.
- निर्गुंतवणुक आयोग स्थापन करण्याची शिफारस. **1996 - मध्ये श्री. जी.व्ही. रामकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली 'पहिला निर्गुंतवणुक आयोग'**. 57 उपक्रमांच्या निर्गुंतवणुक शिफारस.
- तीन वर्षानंतर 24 जुलै, 2001 मध्ये NSE चे माजी संचालक श्री. आर.एच. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निर्गुंतवणुक आयोगाची पुर्नरचना.

**कार्ये :-**

a) सार्वजनिक उपक्रमांच्या निर्गुंतवणुकीस सरकारला सल्ला देणे.

b) शासनास मार्गदर्शन.

c) श्रमिक, कर्मचारी व भागधारकाच्या हिताचे रक्षण.




- **2010 - 24 एप्रिल पंचायतराज दिन म्हणुन साजरा.**
- 73 वी घटना दुरुस्ती :- 64 वे घटना दुरुस्ती विधेयक 1989.
- पंचायत राज नावाने भाग-9 घटनेत समाविष्ट करणे.
- 243-A-O कलमे समाविष्ट.
- **ग्रामिण स्तरावरील पंचायत राज व्यवस्थेत घटनात्मक दर्जा देण्यासाठी 73 वी दुरुस्ती.**
- परिशिष्ट - 11 समाविष्ट करण्यात आले.
- घटनादुरुस्ती 24 एप्रिल, 1993 पासुन लागू.
- ग्रामसभा, पंचायत, प्रौढ मतदान अनुसुचित जाती-जमाती, राखीव जागा.

## 73 वी घटना दुरुस्ती :-




- नागरी पंचायत राज - **जिल्हा नियोजन मंडळ.**
- भाग 1 - अ घटनेत समाविष्ट.
- नागरी स्तरावरील पंचायत राज - घटनात्मक दर्जा.
- परिशिष्ट - 12 चा समावेश - 18 विषयाचा समावेश.
- **1 जुन, 1993** पासुन घटना दुरुस्ती लागू.
- 243 P ते 243 2D कलमाचा समावेश.
- 20 एप्रिल, 1993 - 74 वी दुरुस्ती राष्ट्रपतीची सही.
- स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा.
- 31 मे 1993 - शिफारशी सर्व राज्यांना लागू.
- 243 - 2D - जिल्हा नियोजनास घटनात्मक दर्जा देणे.
- 243 - P - महत्त्वाच्या व्याख्या.

- 243 - P जे G पर्यंत समावेश.

- रुपया व्यापार खात्यावर पुर्ण परिवर्तनीय :-
**1993 - दृश्य खात्यावर - परिवर्तनीय**
**1994-95 - संपुर्ण चालू खात्यावर - परिवर्तनीय**
**1992 - चालू खात्यावर अंशतः परिवर्तनीय.**

- **1993-94 - खाजगी क्षेत्रात बँकांना परवाना.**

**योजना :-**

**1. राष्ट्रीय महिला कोष - 1992-93 :-**

- असंगठीत क्षेत्रातील महिलांना - निर्धन महिलांना वित्तीय गरजा पुरवणे.
- महिला व बालविकास राज्यमंत्री या कोषाचे पदसिद्ध अध्यक्ष असतील.

**2. 2 ऑक्टोबर, 1993 - तीन योजना :-**

**अ) EAS - Employment Assurance Scheme= आश्वसित रोजगार योजना :-**

- दुर्गम भागातील कुटुंबाना किमान - 2 व्यक्तींना 100 दिवस मजुरीचे आश्वासन.

**ब) पंतप्रधान रोजगार योजना** - Prime Ministers Rojgar Yojan (PMRY)

- बेरोजगार युवात व्यवसायीकतेला चालना देणे.
- सबसिडी वित्तीय मदत देणे.
- सध्या ही योजना प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती योजनेत समाविष्ट आहे.

**क) महिला समृद्धी योजना :- MSY**

- ग्रामीण महिलाची बचत वाढवणे.

राष्ट्रीय महिला कोष
Rashtriya Mahila Kosh

**4. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना - 23 डिसेंबर, 1993.**

**5. 15 ऑगस्ट, 1995 - तीन योजना.**

a) राष्ट्रीय सामाजिक सहायता योजना - National Social Assistence Program - NSAP.
b) मध्यान्ह आहार योजना - MMS
c) इंदिरा महिला योजना - Imy

**6. ग्रामिण कारागिरांना सुधारित साधनांचा संच पुरणारी योजना**

- SITRA - Supply of Improved Toolt Pre Rural Asstsns) - 1992.

**7. संगम योजना - 15 ऑगस्ट, 1996.**

ग्रामीण भागातील अपंग व्यक्तीचे गट तयार करणे.
गटांना 15 हजार वित्तीय साहाय्यता देणे.
गटांना - संगम गट म्हणतात.

**8. 1 फेब्रुवारी, 1997 - गंगा कल्याण योजना.**

- शेतकऱ्यांना भुपृष्ठजल व भुजलाचा विकास करण्यासाठी वित्तीय मदत.


**मूल्यमापन -**

1. योजना जवळ जवळ सर्व क्षेत्रात यशस्वी झाली. 5.6 टक्के एवढे लक्ष्य असलेला वाढीचा दर वार्षिक सरासरी 6.68 टक्के इतका साध्य झाला.
2. कृषी व सलंग्न क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर 3.9 टक्के इतका साध्य झाला. (लक्ष्य- 3.5 टक्के)
3. उद्योग क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर 8.0 टक्के एवढा साध्य झाला. (लक्ष्य - 7.5 टक्के)
4. सेवा क्षेत्रात वार्षिक सरासरी वाढीचा दर 7.9 टक्के एवढा साध्य झाला. (लक्ष्य - 6.0 टक्के)
5. ऋण सेवा गुणोत्तर (Debt service Ratio) 1990-91 मधील 35.3 टक्के हून 1998-99 मध्ये 18 टक्क्यांनी पर्यंत कमी झाले.

**राजकीय घटक :-**



- 1993 - मध्ये मुंबई साखळी बॉम्ब स्फोट - बॉम्बे क्षेत्र - 13 ठिकाणी.




- **बाबरी मस्जिद घटना :-**

6 डिसेंबर, 1992 - उत्तरप्रदेश - आयोध्या.
शहर - नायाधिश - मनमोहन सिंग लिवरहान यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग.

# नववी पंचवार्षिक योजना

**(स्वातंत्र्यच्या 50 व्या वर्षी योजना सुरु)**

- **कालखंड :- 1 एप्रिल, 1997 - 31 मार्च, 2002.**
- **घोषवाक्य :- सामाजिक न्याय समतेसह आर्थिक वाढ.**
- **मुख्य भर :- कृषी व ग्रामीण विकास.**
- 9 वी योजना दीर्घकालीन योजनेचा होती - Perspective Plan. 4 बाबीवर अवलंबून योजना.
  1. **राहणीमानाचा दर्जा,**
  2. **उत्पादनक्षम रोजगारनिर्मिती,**
  3. **प्रादेशिक असमतोल,**
  4. **स्वालंबन.**
- **अपेक्षित दर :- 6.5,**
  **वास्तविक दर :- 5.5.**
- **अध्यक्ष :-**



**आर.के. गुजराल** - 1998 पर्यंत



**अटलबिहारी वाजपेयी**
- मार्च 1998 नंतर.

- **उपाध्यक्ष :- मधु दंडवते** - मार्च 1998 पर्यंत, **जसवंत सिंग** - मार्च 1991 ते फेब्रुवारी 1999., **के.सी. पंत** - 1999 नंतर.

- **योजनेचा खर्च :-** प्रस्तावित खर्च - **8,95,200** कोटी रुपये.
  वास्तविक **खर्च :- 9,41,040 कोटी रु.**

| सार्वजनिक खर्च | GDP % खर्च विभागणी |
|---|---|
| कृषी | 12.8% |
| ऊर्जा | 25.4 |
| **उद्योग** | **26.9** |
| वाहतुक | 14.2 |
| सामाजिक सेवा | 20.7 |

## उद्दिष्टे :-

- शेती व ग्रामिण विकास अग्रस्तान.
- शेती उत्पादकता वाढवून रोजगार निर्मिती करणे.
- ग्रामिण दारिद्र्य दुर करणे.
- किंमत पातळी स्थिर ठेवुन वृद्धी करणे.
- पौष्टिक अन्नधान्य पुरवठा करणे.
- आर्थिक विकास दर 6.5% गाठणे.
- सर्वांना किमन पायाभूत मुलभूत सेवा पुरवणे.
- लोकसंख्यावाढीवर प्रभावी नियोजन करणे.
- स्त्रिया, अनुसूचित जाती व जमाती इत्यादींना सुविधा पुरवणे.
- लोकांचा सहभाग वाढू शकणाऱ्या संख्येचा विकास करणे. उदा. पंचायत राज संस्था, सहकारी, इत्यादी.

## विकास दर साध्य :-

- **GDP :- कृषी - 2.44, उद्योग - 4.29, सेवा - 7.87, बचत दर - 23.7, गुंतवणुक दर - 24.23.**

## राजकीय घडामोडी :-

- **पोखरण - II** - 11-13 मे 1998 - शक्ती 98.
  प्लुटोनिअम - 239, युरेनियअम - 233.
  प्रमुख - डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे होते.



- **कारगिल युद्ध :-** मे 1999 ते जुलै 1999.
  **'ऑपरेशन विजय'** - लष्करी कारवाई.



- **गोध्रा हत्याकांड :-** 27 फेब्रुवारी, 2002 -
  हिंदु कारसेवकावर हल्ला. 58 कारसेवाकांचा मृत्यु.
  साबरमती एक्सप्रेस.



- राज्यनिर्मिती :- 84 वी घटनादुरुस्ती -
  1 नोव्हेंबर, 2000 - मध्यप्रदेश मधुन **छत्तीसगढ.**
  9 नोव्हेंबर, 2000 - उत्तरप्रदेश मधुन **उत्तराखंड.**
  15 नोव्हेंबर, 2000 - बिहार मधुन **झारखंड.**

- **विशेष घटनाक्रम :-**

- एप्रिल - 1997 - दुसरे प्रचवार्षिक परकीय धोरण.

- NHDP -
  National Highways Development Programme=
  1998 - (राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम)

- 1997 - सार्वजनिक उद्योगांना स्वायत्ता प्रदान.
  मागील तीन वर्ष सतत नफ्यात. कर वजा जाता 30 कोटींचा निव्वळ नफा.
  अनुसूची - अ मध्ये असने.

*Foreign Exchange Regulation Act*

**FEMA vs. FERA**

*Foreign Exchange Management Act*

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना**
**1 एप्रिल 1999**
**इतर 6 योजनांचे एकत्रिकरण**

**SJGSY**

S J G S Y ← IRDP, TRYSEM, DWCRA, MWS, GKY, SITRA

**स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना**
**1 डिसेंबर 1997**
**इतर 3 योजनांचे एकत्रिकरण**

**SJSRY**

S J S R Y ← NRY, UBSP, PMIUPEP

मागील 3 वर्षात उत्कृष्ट किंवा सर्वोत्तम असने.
6 घटकातील 60 पेक्षा जास्त गुण. नफा प्रमाण - 15%.
नवरत्न - 17. मिनिरत्न I - 57, II - 16, महारत्न - 7.

- **जुन 1999 - राष्ट्रीय कृषी विमा योजना.**
VIAS - यानुसार कृषी विमा महामंडळ - स्थापना.

- **फेब्रुवारी 2000 - दुसरे राष्ट्रीय लोकसंख्या धोरण.**
1992 - श्री. करुणाकरन समिती शिफारस. 1993 - एम.एस. स्वामीनाथन.
उद्देश :- संसती नियमन, आरोग्य, पायाभूत सुविधा पुरवणे, प्रजनन व बालआरोग्य सेवा, जननदर 2.1 आणणे 2010 पर्यंत प्राप्त करणे. 2045 पर्यंत लोक स्थिर करणे.

- ध्येय :- 14 वर्ष शिक्षण मोफत. शाळा गळती 20% कमी करणे. शिशू मृत्युदर - 30% कमी करणे. माता मृत्युदर 100 पेक्षा खली आणणे. 20 वर्षानंतर मुलींची लग्न.

**योजना :-**

- **फेमा कायदा :-** FERA च FEMA 1999. 1 जुन 2000 पासुन लागू.
- SEZ - 2000.
- **स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना SJSRY.**
1 डिसेंबर, 1997 - NRY UBSP & PMIVPEP योजनाचे विलनीकरण.
- **अन्नपुर्णा योजना -** 1 मार्च, 1999.
- **समग्र आवास योजना 1 एप्रिल 1999**
- **जवाहर ग्राम समृध्दी योजना एप्रिल 1999**
- **प्रधानमंत्री ग्रामोदय योजना 2001**
- **प्रधानमंत्री ग्रामसडक योजना 25 डिसेंबर 2000**
- **सर्व शिक्षा अभियान 2001**
- **अंत्योदय अन्न योजना डिसेंबर 2000**
- **वाल्मिकी आंबेडकर आवास योजना 2 डिसेंबर 2001**
- **संपूर्ण स्वच्छता अभियान - 1999**

**मुल्यमापन :-**

- वाढीचे लक्ष पुर्ण झाले नाही.
6.5 प्रत्यक्षात 5.52%

| | VIII | IX |
|---|---|---|
| कृषी | 4.69 | 2.44 |
| उ.ोग | 7.58 | 4.29 |
| सेवा | 7.54 | 7.87 |
| एकुण | 6.8 | 5.42 |
| बचत दर | 26.3 | 23.3 GDP |
| गुंतवणुक दर | 28.3 | 24.2 GDP |


- औद्योगिक उत्पादन - 8% होता
पण वास्तविक 5% राहिला.
- 1996-97 : 2000-01 - 5%.

# दहावी पंचवार्षिक योजना

- **कालावधी :- 1 एप्रिल, 2002 ते 31 मार्च, 2007.**
  (21 डिसेंबर, 2002 ला राष्ट्रीय विकास परिषदेची मान्यता)
- **प्रतिमान - गांधीवादी.**
- **खर्च - 2060193 कोटी रुपये.**
- **अध्यक्ष -**



**अटलबिहारी वाजपेयी**
मे 2004 पर्यंत



**मनमोहन सिंग** -
मे 2004 नंतर.

- **उपाध्यक्ष -** के.सी. पंत. - जुलै, 2004 पर्यंत. मॉन्टेंकसिंग अहलुवालीया - जुलै 2004 नंतर.
- **GDP वृद्धी -**
  **अपेक्षित लक्ष्य - 7.9%,**
  **वास्तविक लक्ष्य - 7.7%**
- सार्वजनिक खर्च - 15,25,639 कोटी, प्रत्यक्षात खर्च - 16,18,460 कोटी.

**मूल्यमापन -**

- ही योजना बहुतांश यशस्वी ठरली होती.
- या योजनेदरम्यान 7.6 टक्के वृध्दीदर साध्य झाला.
- उद्योग आणि सेवा क्षेत्राचे उद्दिष्ट साध्य झाले.
- उद्योगक्षेत्र 8.9 टक्के तर सेवा 9.3 टक्के साध्य झाले.
- गुंतवणुक दर जीडीपीच्या 30.8 टक्के साध्य झाला.
- बचतीच्या दरामध्ये वाढ होवून 23.31 टक्क्यावरुन 29.9 टक्के एवढा साध्य झाला.
- भाववाढीचा दर सरासरी 5% होता.

**घोषवाक्य -**

रोजगार उर्जा व सामाजिक विकास

**मुख्यभर - शिक्षण - सामाजिक सेवा**

| **सामाजिक सेवा** | **27.0%** | 436529 |
|---|---|---|
| ऊर्जा | 22.4% | 363635 |
| उद्योग | 4.0% | |
| कृषी | 20.2% | |
| वाहतुक | 16.3% | 263934 |
| दुरसंचार | 5.1% | |
| तंत्रज्ञान | 1.8% | |
| ग्रामीण विकास | 8.5% | 137710 |
| अर्थ व सेवा | 1.9% | |

**योजनेची उद्दिष्ट्ये :-**

1. पुढील 10 वर्षात उत्पन्न दुप्पट करणे.
2. स्थुल राष्ट्रीय उत्पादन 11% ने वाढ करणे मुख्यलक्ष.
3. राहणिमानाचा दर्जा सुधारणे.
4. दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्या प्रमाण 20% पर्यंत कमी करणे, 2012 पर्यंत 11% पर्यंत कमी करणे.

5. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर भर देण्यात आला असून पाच वर्षांवरील सर्व बालकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देणे. साक्षरता दर 72% वाढवणे.

6. लोकसंख्या वाढीचा दर 16.7% कमी करणे.

- साक्षरता 2007 - 75% तर 2012 पर्यंत 80%. पर्यंत वाढवणे.
- 25% जमीन वनाखाली आणने.
- बालमृत्यु दर - 2007 - 45. 2012 - 28%. मातामृत्यू दर 2%.

## राजकीय घटक :-

- 86 वी घटना दुरुस्ती - सक्तीच्या शिक्षणाबाबत 12 डिसेंबर, 2002, 86 वी घटना दुरुस्ती.
- भारत अमेरिका नागरी अणुकरार - 18 जुलै, 2005 **मनमोहन सिंग आणि जॉर्ज बुश - अणुकरारास मान्यता.**



- मुल्यवर्धीत कर (VAT) 1 एप्रिल, 2005.
- **भारत निर्माण योजना** - 2005-06.
- गृहनिर्माण, सिंचन, पेयजल, रस्ते, विद्युतीकरण, दुरसंचार.
- 6 क्षेत्रिय योजना. पयाभूत सुविधा पुरवणे.
- **JNNURM** -Jawahaeral Nehru National Urban Renwal Mision : जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरत्थान अभियान.
- 3 डिसेंबर, 2005 - सात वर्षासाठी शहरांचा विकास करणे. पयाभूत सुविधा, शहरी गरिबांना मलभुत सेवा उपलब्ध.
- भारतीय शहराची पुर्ण क्षमता वापरला जाण्यासाठी.
- 2 घटकांना संबंधी. निवारा व गरीबांना मुलभूत सुविधा.
  i) 65 निवडक शहरासाठी शहरी गरीबाकरिता मुलभूत सुविधा.
- **राष्ट्रीय विकास योजना :-**
- **संपुर्ण स्वच्छ अभियान 2002.**
- **कस्तुरबा गांधी राष्ट्रीय विद्यालय योजना - ऑगस्ट 2004.**
  **राष्ट्रीय विकास योजना - 2002-03.**
  एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम 3 डिसेंबर, 2005

**शासकीय योजना :-**

- **वंदे मातरम् योजना - 9 फेब्रुवारी, 2004.**
  गर्भवती तपासणी व गरोदर काळात आरोग्य सेवा. शासकीय व खाजगी आरोग्य यंत्रणांच्या सहभागाने.
- **राष्ट्रीय कामाच्या बदल्यात अन्न योजना -** 2006 पासुन NREYGA मध्ये समाविष्ट.
  NFFWP - National Food For Work Programme - 14 नोव्हेंबर, 2004.
  अकुशल मजुरांना अन्न संरक्षण देण्यासाठी.
  अतीमागास जिल्ह्यांमध्ये 100% केंद्रपुरस्कृत कामासाठी अन्न.
- **सामाजिक सुरक्षा प्रायोगिक योजना -** 23 जानेवारी, 2004.
  असंगठीत क्षेत्रातील कामगाराला सामाजिक सुरक्षा पुरवणे. पेन्शन, विमा, आरोग्य.

- **जननी सुरक्षा योजना JSY :-**
  संस्थात्मक प्रसुती वाढवणे - 12 एप्रिल, 2005.
  तपासनी, प्रसुती, आ. मदत, इत्यादी.

- **राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :-**
  **सुरुवात :-** 2 फेब्रुवारी, 2006 -
  National Rural Employment Guratee Scheme.
  **संपुर्ण ग्रामिण रोजगार योजना -** राष्ट्रीय कामासाठी अन्न योजना.
  यांच्या एकत्रिकरणातुन NAREGA.
  NREGS कायदा - 7 सप्टेंबर, 2005 संमत.

- **2 ऑक्टोबर, 2009 - महात्मा गांधी असे नाव देण्यात आले.**
  अन्नधान्य 2002 दशलक्ष.
  कृषी - 2.3%, बचत दर - 31.8%,
  गुंतवणुक - 28.41%, उद्योग - 9.17%, सेवा - 9.30%,
  चलनवाढ - 21.7%,
  रोजकोषीय तुट 5.9 होती - 3.3% कमी.
  औद्योगिक उत्पादन 10% गाठणे लक्ष्य होते, प्रत्यक्ष 8.2%.

- **एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम**
  **IHSDP** 3 डिसेंबर 2005

# अकरावी पंचवार्षिक योजना

- **कालावधी :- 1 एप्रिल, 2007 ते 31 मार्च, 2012.**
- **17 ऑक्टोबर, 2006 मध्ये नियोजन आयोगाने 11 व्या योजनेचा आराखडा तयार केला.**
- **प्रतिमान - PURA.**
- **मुख्य भर - सामाजिक सेवा** - 30.9%.
- **घोषवाक्य - सर्वसमावेशक तीव्र विकास.**
  **PURA - Provision of Urban Amenities to Rural Area.**
  **संकल्पना - Dr. A.P.J. Abdul Kalam.**
- ग्रंथात Traget 3 Billion - Coauthwred - Srijan Pal Sign. प्रतिमाची मांडणी.
- शहरी भागातील पायाभूत सुविधा ग्रामिण भागात पुरवणे.
- आर्थिक संधी ग्रामीण भागात पुरवणे.
- दळणवळण पुरवणे.
- 2004 - मध्ये केंद्राने वेगवेगळ्या राज्यात PURA प्रतिमान वापरले.
- 2003 च्या 54 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्य बोलताना PURA प्रतिमान मांडले.
- ध्येय - ग्रामपंचायत क्षेत्रात जलद विकास घडुन आणने.

- **अध्यक्ष**



**डॉ. मनमोहन सिंग.**

- **उपाध्यक्ष - माँटेकसिंग अहलुवालिया.**



- 19 डिसेंबर, 2007 ला 11 व्या योजनेस रा. विकास परिषदेची (54 वी सभा) मंजुरी.
- नियोजन मंडळ - योजनेस मंजुरी - 9 नोव्हेंबर, 2007.
- कॅबिनेट मंजुरी - 30 नोव्हेंबर, 2007
- 36,44,718 कोटी - प्रस्तावित सार्वजनिक खर्च.
  (केंद्र व राज्य)
  केंद्र - 21,56,54 (59.2%), 14,88,147 (40.8%)

| क्षेत्र | खर्च | प्रमाण (%) |
|---|---|---|
| ◆ सामाजिक सेवा - | 11,97,576 | 32.57%. |
| ◆ ऊर्जा निर्मिती - | 684811 | 23.4%. |
| ◆ वाहतुक दळणवळण - | 613185 | 16.68% |
| ◆ ग्रामिण विकास - | 28,8209 | 7.84.% |
| ◆ जलसिंचन - | - | 5.8.% |
| ◆ विज्ञान, तंत्रज्ञान - व पर्यावरण | - | 1.7.% |
| ◆ साधारण सेवा - | - | 1.2% |
| ◆ उद्योग खनिजे - | - | 4.2% |

**उद्दिष्ट्ये :-**

1. GDP मध्ये सरासरी 9 व नंतरच्या काळात **8.1%** ने वाढ होईल व **10 वर्षात दुप्पट करणे** -
प्रतिवर्ष - **7.6% वाढ.**
2. सर्वसमावेशक आर्थिक विकास साध्य करणे.
3. पंचायतराज व्यवस्थेमार्फत ग्रामिण सेवांचा पुरवण्याची अधिक प्रभावीपणे देखभाल करणे तसेच या कामासाठी शहरी भागात NGO ची मदत घेणे.
4. सार्वजनिक सेवांची गुणवत्ता वाढवणे व शासकीय खर्चात वाढ करणे.
5. कृषी क्षेत्रात वार्षिक **4%** वृद्धी करणे.
6. 2010 पर्यंत प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करणे.
7. गरिबी प्रमाण **10%** कमी करणे.
8. शेतमालाच्या विविधीकरणाला प्रोत्साहन देणे.
9. ऊर्जा कार्यक्षमता **30%** वाढवणे - **78 ह**जार मगावॅट ऊर्जा.
10. 0-3% पर्यंत मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण **50%** पर्यंत कमी करणे.
11. उच्च शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण **10% वरुन 15%** करणे.
कृषी व उद्योगाच्या वृद्धीत वाढ करण.

**11 व्या योजनेची दृष्टी (6 घटकावर अवलंबून) -**
**(Vision of the 11th Plan)**

1. वेगवान वृद्धी ज्यामुळे दारिद्रय कमी होऊन रोजगार संधी निर्माण होईल.
2. आरोग्य, शिक्षण अत्यावश्यक सेवांची उपलब्धता करणे विशेषतः गरिबासाठी.
3. शिक्षण व कौशल्याचा विकास करणे.
4. पर्यावरणीय शाश्वत विकास.
5. लिंगाविषयक असमानता कमी करणे.
6. शस्त्र प्रणालीत सुधार.

**आर्थिक सुचक / निर्देशांक**

1. **एकुण देशांतर्गत उत्पादन वृद्धीपैकी 8.5**
   a) शेती - 3.9.
   b) उद्योग - 9.9
   c) सेवा - 9.4.
2. **गुंतवणुक - 33.6.**
   a) सार्वजनिक क्षेत्र - 10.4
   b) खाजगी - 23.2.
3. **देशांतर्गत बचत दर - 31.00**
   a) कुटुंब क्षेत्र - 20.7.
   b) निगम क्षेत्र - 5.8
   c) सार्वजनिक क्षेत्रातील - 3.0.
4. **चालू खात्यातील शिल्लक - 2.6%.**
   a) आयातीतील वाढ - 12.1.
   b) निर्यातीतील वाढ - 16.00

**क्षेत्र :-**

1. दारिद्रय व रोजगार क्षेत्र :-
11 व्या योजनेत 5.8 कोटी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे. त्यापैकी 2.8 उद्योग तर 3.4% सेवा क्षेत्रात.
2. दारिद्रय प्रमाण 10% पर्यंत कमी करणे.
3. सुशिक्षित बेकारी - 5% कमी करणे.

## व्यापार तोल :-


- 11 व्या योजनेत वार्षिक वाढीचा दर 20% ने गाठणे.
  GDP - निर्यात प्रमाण 2006-07 - 13.95%, 2011-12 - 22.5% वाढवणे.
  वार्षिक आयात - 23% राखने. 2006-07 - 21% वरुन 2011-12 - 38.5% वाढवने.
- वृद्धी दर :- 2007-08 - 9.3, 2008-09 - 6.7, 2009-10 - 8.6, 2010-11 - 6.2, 2012-13 - 5.0.
- **कृषी - 3.2%, बचत दर - 34.4%,**
  **उद्योग - 7.4%, गुतवणुक - 36.5%.**
  सेवा - 10%.
- 2007 - आम आदमी विमा योजना - सामान्य जनतेसाठी संरक्षण.
- 2007 - राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना - सामान्य जनतेसाठी आरोग्य.
- 2008 - राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान.
- 2009 - ग्राम बाजार योजना.
- 2010 मध्ये 11 व 18 वयोगटात शरीरिक व मानसिक अपंगांना आधारासठी 'राजीव गांधी सबल योजना'.
- 2010 - इंदिरा गांधी मातृत्व योजना.
- 2011 - 1 लाख जास्त लोकसंख्येच्या शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन - राजीव गांधी शहरी आवास योजना.
- 2011 - वीस कलमी कार्यक्रम.
- 2011 - राष्ट्रीय ग्रामिण आजीविका मिशनमध्ये.

**अपेक्षित दर - 8.1%,**
**वास्तविक दर - 7.9%.**

# बारावी पंचवार्षिक योजना

- **कालखंड - 1 एप्रिल, 2012 ते 31 मार्च, 2017.**
  **अपेक्षित दर - 8.2.**
- **प्रतिमान - गांधीवादी प्रतिमान.**
- मुख्यभर - पायाभूत सुविधाचा विकास.
- **घोषवाक्य - "जलद शाश्वत व अधिक सर्वसमावेशक विकासाकडे वाटचाल."**
- 20 ऑगस्ट, 2011 - नियोजन मंडळाने स्विकार केला.
- 15 सप्टेंबर, 2011 - केंद्रीय मंत्रिमंडळाने त्यास मंजुरी दिली.
- 15 सप्टेंबर, 2012 - नियोजन मंडळाने 12 व्या योजनेस परवानगी दिली.
  तर 27 डिसेंबर, 2012 - राष्ट्रीय विकास परिषदेने 57 व्या बैठकीनुसार त्यास मान्यता दिली.

- **अध्यक्ष**



**मनमोहन सिंग** - 2013 पर्यंत,



**नरेंद्र मोदी** - 2014 नंतर - नंतर योजना स्थगित.

- उपाध्यक्ष - मॉन्टेकसिंग अहलुवालीया, अरविंद पनगठिया.
- योजना खर्च - 76,69,807 कोटी रु. - नियोजित खर्च.

| | क्षेत्र | खर्च | प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| 1. | कृषी व संलग्न | 3603273 | 4.74% |
| 2. | ग्रामिण विकास | 457464 | 5.96% |
| 3. | विशेष क्षेत्र कार्यक्रम | 80,370 | 1.05% |
| 4. | जलसिंचन व पुरनियंत्रण | 422012 | 5.50% |
| 5. | ऊर्जा | 1436466 | 18.75% |
| 6. | वाहतुक दळणवळण | 1204172 | 15.70% |
| 7. | संचार | 80984 | 1.06% |
| 8. | विज्ञान व तंत्रज्ञान | 1,67,350 | 2.18% |
| 9. | **सामाजिक सेवा** | **26,64,843** | **34.74%** |
| 10. | इतर सेवा | 1,07,959 | 1.41% |
| 11. | उद्योग | 377302 | 4.12% |
| 12. | साधारण सेवा आर्थिक | 3,07,612 | 3.18% |
| | | | **100%** |

## योजनेची उद्दिष्ट्ये / लक्ष :-

1. कृषिक्षेत्राच्या वाटचालीत सुधारणा झाली पाहिजे - **4%** वृद्धीदराने.
2. वाढीच्या दराचे लक्ष - 8% वार्षिक सरासरी, कृषी क्षेत्र **4%, उद्योग - 7.6%, विजनिर्माण क्षेत्र - 7.1%, सेवा क्षेत्र - 9.0%, बचत दर - 33.6%. GDP**
3. बचत दर - **33.6% (GDP).**
4. गैरकृषी क्षेत्रात **5 कोटी रोजगार निर्मिती.**
5. **दारिद्र्यरेषेखालील प्रमाण 10%** ने कमी करणे.
6. लिंग प्रमाण दर - **(0-6 वय), 950** वर नेणे. बाल मृत्यू दर **25** माता मृत्युदरावर आणने.
7. एकुण प्रजनन दर 2.1% पर्यंत खाली आणणे.

8. सर्व गावांचे विद्युतीकरण.

9. सर्व गावांना बारमाही रस्त्याने जोडने - राष्ट्रीय व राज्य महामार्ग दुपारीकरण करणे.

10. ग्रामीण भागात टेलिफोन घनता 70% वाढवणे.

11. शिक्षण वर्ष 7 पर्यंत वाढवणे.

12. सिंचन क्षेत्र - 90 दशलक्ष वरुन - 103 दशलक्ष हेक्टर वाढवणे.

**लक्ष्य :-** GDP च्या प्रमाणात

- गुंतवणुक दर - 38.8%.
- बचत दर - 33.6%.
- एकुण उपभोग खर्च - 69.3%
- वस्तु निर्यात - 16.0%, वस्तू आयात - 25.2%
- वस्तू व्यापार तुट -9.2%, सेवा निर्यात - 3.5%
- भांडवली खात्यावरील तुट - 3.9%
- चालु खात्यावरील तोल - 3.4%

**विकास दर - 8.0%**
**कृषी क्षेत्र - 4.0%,**
**बचत दर - 36.2%,**
**उद्योग - 8.0%**
**गुंतवणुक दर - 38.7%**
**सेवा - 9.0%**

1. 24 सप्टेंबर, 2013 - स्वर्णजयंती रोजगार योजनेची पुर्नरचना करुन राष्ट्रीय शहरी जीवनोन्नती अभियान NULM - National Urban Livehood Mission.

2. दारिद्र्य निर्मुलनासाठी कार्यगट - 16 मार्च, 2015. अध्यक्ष - अरविंद पानगरिया. दारिद्र्याची समग्र व्याख्या बनवून दारिद्र्य निर्मुलन करणे.

3. 25 सप्टेंबर, 2014 - 'दीनदयाल अत्योंदय योजना' - रोजगार पुरवणे, कौशल्यविकास पुरवणे.

## शिक्षण :-

- 7 वर्षाहुन अधिक - 85% साक्षरता वाढवणे.
- लिंग गुणोत्तर - 10% ने कमी करणे.
- उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या 10% वरुन 15% करणे.
- कृषी सर्वाधिक खर्च - पहिली योजना - 31.1%
- सर्वात कमी - 11 वी योजना - 18%.
- 5% जास्त लक्ष - 6 वी योजना.
- 7% जास्त लक्ष -10 वी योजना.
- 11 वी योजना - 8.2% वृद्धीदर.
  पाच योजनांचा साध्य दर - लक्ष दरापेक्षा जास्त.
  I V VI VII VIII
  साध्य दरापेक्षा लक्ष दर अधिक.
  II III IV IX X XI
- सर्वात कमी सार्वजनिक खर्च - पहिली योजना.
- सर्वाधिक सार्वजनिक खर्च - 12 वी योजना.